## पोंच.

संजीवनः—मासिक. संपादक श्री देवराव विष्णू नाईक, दादर, मुंबई नं. १४ मलपृष्ठांवर दिलेल्या "उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान् निबोधत" या अवतरण वाक्यावरून संजीवनाच्या ध्येयाची कल्पना करिता येते. हें मासिक एका विशिष्ट-ब्राह्मण (गोवर्धन ब्राह्मण) समाजाच्या उन्नतीकरितां अवतीर्ण झालेलें दिसत आहे, परंतु त्याचा उपयोग इतर ब्राह्मण समाजाला पुष्कळ होण्यासारखा आहे. आमच्याकडे आलेल्या ४ थ्या वर्षाच्या एप्रिल मे १९२५ च्या जोड अंकात असलेले लेख मासिकाच्या ध्येयाला पोषक असे आहेत. जनतेच्या सामाजिक व धार्मिक उन्नतीकरितां "संजीवन" "ब्राह्मण" अशा तऱ्हेच्या मासिकांची फार जरूर आहे. व प्रत्येक समाजाने (कांहीं करीतही आहेत) आपआपल्या उन्नतीकरितां या बाजूनें प्रयत्न करणें अवश्य आहे. संजीवनानें भेट दिल्याबद्दल आभारी आहोंत. श्री साईलीला परत भेटीला जाईलच.

**श्रीधर्म शिक्षण व निराश्रित विद्यार्थी फंडाचा सातवा वार्षिक अहवाल**—संस्थेचा उद्योग स्तुत्य आहे. स्थापना होऊन ८ वर्षें झालीं परंतु त्या मानानें द्रव्यनिधि फारच अल्प आहे. जनतेने असल्या सर्वोपयोगी संस्थांना झटून मदत केली पाहिजे. आहे त्या परिस्थितींत ११ विद्यार्थ्यांना संस्थेकडून मदत मिळत आहे.

